रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

रविवार, दि. १७ जुलै, २०२२

### आझादी का अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत मराठी विभाग आयोजित

### प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला

### विषय - प्रा. डॉ. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळ

### वक्ते – मा. भास्करराव कदम

### अहवाल

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे कैवारी, कृतिशील विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याची महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना ओळख व्हावी, या उद्देशाने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

या उपक्रमातील चौथे व्याख्यान डॉ. भास्करराव कदम यांचे झाले. 'प्रा. डॉ. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळ' या विषयावर बोलताना मा. भास्कर कदम म्हणाले, ''आजचे वर्तमान अतिशय भयावह आहे. अशा या भयावह परिस्थितीत एन. डी. पाटील यांच्या अस्तित्वाची चणचण सतत भासते. एन. डी. पाटील सरांनी आयुष्यभर फुले-शाहू-आंबेडकर-महर्षी शिंदे यांच्या पुरोगामी विचारांना पुढच्या पिढीकडे नेण्याचे काम केले. एन. डी. पाटील यांनी शेतकऱ्यांच्या हितामध्ये सरकारने हस्तक्षेप करावा आणि धोरणात्मक गोष्टी राबून शेतकऱ्यांचे हित साधावे यासाठी आयुष्यभर लढा दिला.''

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम लाभले होते. अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, ''आज शेतकरी, कष्टकरी, शेतकरी श्रमजीवी लोकांवर अन्याय झाला तर त्यांच्यामागे कोण उभे राहणार असा प्रश्न आज बहुजन समाजासमोर आहे. प्रा. एन. डी. पाटील यांच्या रूपाने अशा वंचितांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक कृतिशील नेता मिळाला होता.''

सदर कार्यक्रम यशास्वीपणे पार पाडण्यासाठी मराठी विभागाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. दिलीप कोने यांनी केला. आभार डॉ. नितीन कुंभार यांनी मानले; तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व

**लाभार्थी :** ६४







विभागप्रमुख
मराठी विभागप्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
RAMANANDNAGAR (BURLI)

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)
प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.